# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६
## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री. महेश लांडगे, शंकर जगताप, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भोसरी विधानसभा मतदार क्षेत्रातील पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक आणि निवासी अशा दोन्ही पट्टयातील वीज ग्राहकांना नियमितपणे वीज समस्यांना सामोरे जावे लागणे, समाविष्ट गावात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढलेली असून त्या तुलनेत वीज यंत्रणा सक्षम करण्यात आली नसणे, त्यामुळे वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी काही विकासकामे तात्काळ मार्गी लावणे आवश्यक असणे, सफारी पार्क मोशी अतिउच्चदाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्र उभारण्यात येणार असणे, मोशी, डुडुळगांव, आकुर्डी, चिखली, तळवडे याभागातील औद्योगिक व निवासी पट्टयातील वीज पुरवठा सुरळीत होणार असणे, चऱ्होली अतिउच्चदाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्र उभारण्यात येणार असणे, त्यामुळे भोसरी, चहोली, दिघी, धानोरी याभागात पुरेशा दाबाने वीजपुरवठा करणे सुलभ होणार असणे, भोसरी गावठाण येथील नवीन स्विचिंग उपकेंद्र भोसरी विधानसभा मतदारसंघांतर्गत ओव्हरहेड वीज वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रुपांतर करणे, सविस्तर योजना राबवणे, तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फिडर बे व भूमिगत काम तातडीने करण्याची योजना राबवत त्याला गती देण्याची नितांत आवश्यकता, भोसरी विभागांमधील वाढत्या शहरीकरणाचा विचार करून चहोली, मोशी येथे अतीउच्चदाब उपकेंद्राचे प्रस्ताव सादर करणे, तसेच मुख्य अभियंता, पुणे परिमंडल यांचे सूचनेप्रमाणे भोसरी येथील सेंच्युरी इंका या अतिउच्चदाब उपकेंद्रामध्ये दोन पावर ट्रान्सफर्मर बसविण्याचा प्रस्ताव असणे, यासह मध्यम दाब स्वीचिंग स्टेशनसाठीही प्रस्ताव सादर केला असणे, त्यामुळे रहिवासी भागात तसेच औद्योगिक ग्राहकांना विजेची चांगली

सेवा देणे सोयीचे होणार असल्याने याबाबत शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील चांदिवली विधानसभा मतदारसंघातील तसेच उपनगरातील महानगरपालिकेच्या उद्यानात गर्दुल्ले व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचा वावर वाढल्याने नागरिकांना अस्वच्छता व असुरक्षितता निर्माण झालेली असणे, मुंबई महानगरपालिकेकडून नागरिकांच्या आरोग्यवर्धनासाठी, सकस वातावरणात व्यायाम, चालणे व विरंगुळ्यासाठी महानगरपालिकेकडून उद्याने सुरू करण्यात आली असणे, मागील काही दिवसांपासून या उद्यानात गर्दुल्ले व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचा वावर वाढला असून त्यामुळे उद्यान परिसरात अस्वच्छता, काचेच्या बाटल्यांचे तुकडे, सिगारेटच्या तुकडयांचा खच पडलेला असणे, अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरणे, रात्रीच्या वेळी मद्यपान व धूम्रपान यामुळे उद्याने गर्दुल्यांचे अड्डे बनलेले असणे, या उद्यानात सकाळी व्यायामासाठी आणि फिरायला येणाऱ्या नागरिकांना त्रास व त्यांच्या जिवितास धोका निर्माण झालेला असणे, यास्तव या उद्यानातील अस्वच्छता व सुरक्षेच्यादृष्टीने शासनाकडून पोलीस गस्त अथवा आवश्यक सुरक्षारक्षक नेमणे तसेच आवश्यक प्रकाशयोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री. बापूसाहेब पठारे, विजय शिवतारे, ॲड. राहूल कुल, श्री. सिध्दार्थ शिरोळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहर हे शिक्षणाचे माहेरघर, आयटी हब म्हणून ओळखले जाणे, शिक्षण, नोकरी व कायमस्वरूपी वास्तव्यासाठी दरवर्षी लाखो नागरिक शहरात येत असल्यामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढणे, वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रस्ते व पायाभूत सुविधा अपुऱ्या पडणे, वडगावशेरी मतदारक्षेत्रासह शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरिवाल्यांमुळे वाहतूक कोंडी व गोंगाट होत असणे, दहावी, बारावी तसेच इतर परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना, नागरिकांना प्रचंड त्रास होत असणे, यासंदर्भात महानगरपालिका अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई न होणे, उलट आर्थिक तडजोडीतून अधिकाऱ्यांकडून तक्रारी करणाऱ्या नागरिकांची नावे संबंधित व्यवसायिकांना सांगितली जाणे, त्यामुळे नागरिक व व्यवसायिक यांच्यात वाद निर्माण होऊन कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, सदर बाबी गंभीर स्वरूपाच्या असून शासनाने याची तातडीने दखल घेणे आवश्यक असणे, शहरातील मुख्य व अंतर्गत रस्ते तात्काळ पथारीमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबविणे, यासह अनधिकृत पथारी व्यवसाय व ध्वनीप्रदूषणावर कारवाई करण्याची आवश्यकता, तक्रारदार नागरिकांची नावे गोपनीय ठेवण्याबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून

निष्काळजीपणा आढळल्यास त्यांचेविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. वरुण सरदेसाई, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील मौजे कोले कल्याण भारतनगर या वसाहतीच्या म्हाडा अभिन्यासाच्या एकूण ३,०३,८१५.६० चौ. मी. म्हणजेच सुमारे ४४ एकर क्षेत्रफळापैकी सुमारे १,१३,१२२ चौ. मी. मोकळ्या भूखंडावर झोपडीधारकांनी स्वतः बांधकाम केलेले असणे, या झोपडीधारकांना सद्यस्थितीमध्ये सोयीसुविधा पुरविण्याचे काम म्हाडा मार्फत केले जात असणे, भारतनगर वसाहतीचा समूह पुनर्विकास होऊन रहिवाशांना उच्चतम दर्जाच्या सोयीसुविधा (Amenities), पायाभूत सुविधा (Infrastructure) मिळावे याकरिता म्हाडामार्फत भारतनगर, सी.टी.एस. क्र. ७६४३ (पार्ट), वांद्रे (पूर्व) येथील पुनर्विकास म्हाडाच्या ३३/५ योजनेंतर्गत करण्याचा प्रस्ताव अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०२५ रोजी सादर केलेला असणे, सदर प्रस्तावास मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, सदर प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व शासनाची भूमिका."

(५) **सर्वश्री. चेतन तुपे, अमित साटम, धनंजय मुंडे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. सुनिल प्रभू, सुधीर मुनगंटीवार, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, अमीन पटेल, संजय मेश्राम, डॉ.ज्योती गायकवाड, सर्वश्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, अनिल पाटील, ज्ञानेश्वर कटके, राजेश विटेकर, विठ्ठल लंघे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. मुरजी पटेल, शंकर जगताप, मनोज कायंदे, मोहन मते, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.बाबाजी काळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ रोजी आडोशी बोगद्याजवळ प्रोपिलिन ज्वलनशील रसायन वायू वाहून नेणारा टँकर उलटला असणे, टँकरमधून सुरू असलेल्या वायू गळतीमुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव वाहतूक पूर्णतः बंद ठेवल्याने ३६ तास महामार्ग ठप्प असणे, हजारो प्रवासी, वाहनचालक, रुग्ण व विद्यार्थ्यांचे अन्न-पाण्याविना, मूलभूत सोयीसुविधांविना महामार्गावर अडकून पडून अतोनात शारीरिक व मानसिक हाल झालेले असणे, दोन्ही औद्योगिक महानगरांचे कोट्यवधी रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, अशा गंभीर आपत्कालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेमध्ये कमालीचा समन्वयाचा अभाव दिसून येणे, अडकलेल्या प्रवाशांना तातडीने माहिती देण्यासाठी व वाहतूक वळवण्यासाठी शासनाकडे कोणतीही सक्षम आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था सज्ज नसणे, या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन कार्यवाही व उपाययोजना करण्याची सामाजिक

संघटना, लोकप्रतिनीधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार तक्रारी केलेल्या असणे, वाहतूक कोंडीमुळे होणारा त्रास लक्षात घेऊन भविष्यात अशी घटना घडल्यास कोणत्या प्रकारची सज्जता असावी याबाबत चौकशी करुन शिफारशीसह सविस्तर अहवाल सादर करण्याचे मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांनी एमएमआरडीसी व संबंधीत विभागांना निदेश दिलेले असणे, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी ठाणे येथील दोन अपघातामुळे मुंबई-नाशिक महामार्गावर ४ ते ५ तास वाहतुक कोंडी झालेली असणे, राज्यातील मुंबई-पुणे, पुणे-नाशिक, पुणे-औरंगाबाद, मुंबई-नाशिक यासह इतर महत्वाच्या महामार्गावरील वाहतूक कायमस्वरुपी व्यवस्थीतरित्या होण्याकरिता तसेच आपत्कालीन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याबाबत शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : (शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर,**

**राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सांमत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri **२०२६'** ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**सहा : (शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना)**

**(१) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.**

"चेंबूर (मुंबई) येथील आरसीएफ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंमली पदार्थाची विक्री होत असल्याबाबत" या विषयावरील श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २०९१२ ला दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक २ ते ७)**

**(२) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळयात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाडयांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळयात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.महेश शिंदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात खाद्य उद्योगांमध्ये पदार्थाचे आकर्षण ग्राहकांला होण्याकरिता वेगवेगळे खाद्य रंग वापरले जात असणे, नैसर्गिक रंग वनस्पती, प्राणि आणि खनिजांमधून मिळविले जात असणे, कृत्रिम रंग रासायनिक प्रक्रियेव्दारे तयार करण्यात येणे, सदरहू खाद्यरंग हे आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांना आयएस मानांकन दिले जात असणे, रासायनिक रंगामुळे खाद्यपदार्थाचे आकर्षण वाढविण्यासाठी सिंथेटिक पदार्थाचा वापर करण्यात आल्यामुळे ते मानवाच्या आरोग्यास अपायकारक असणे, यातील कित्येक रंगामुळे कॅन्सर व अन्य रोग उद्‌भवत असल्यामुळे मानवी आरोग्यास अपायकारक असणे, त्यामुळे अन्य देशांत असे रंग वापरण्यास बंदी घातलेली असताना देखील आपल्या देशात सर्रासपणे त्याचा वापर होत असणे, नैसर्गिक रंगाचा

वापर खाद्यपदार्थांमध्ये करण्याची आवश्यकता, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असणे, या संदर्भात केंद्र शासनाचा आयएस स्टँडर्डचे मानांकन बदलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने खाद्यपदार्थामध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्य रंगाचे टॉक्सिक स्टडी करुन त्यांच्या मानांकनामध्ये बदल करण्याबाबत कायदा करण्याची आवश्यकता, निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन उर्जा स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी क्वांटम फिजिक्स आणि बायोलॉजिकल अप्लाईड सायन्सचा वापर करुन औद्योगिक क्षेत्रामध्ये लॅब आणि त्यावरती संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना इन्फ्रास्टक्चर उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दि. १८/०५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात येणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात येणे, परंतू सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी न होणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पनधारक असल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करुन निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. विनोद निकोले, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी अद्यापही सुटलेली नसणे, सुमारे ५५४ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करुन बांधलेल्या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होणे, मुंबईकडील मार्गिकेचे काम अद्यापही धिम्या गतीने सुरू असल्याने नव्याने तयार केलेल्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात खड्डे होणे, अनेक ठिकाणी कॉंक्रिटीकरणाचे काम करताना जुन्या डांबरी रस्त्यावर थेट सिमेंट कॉंक्रीट केल्यामुळे अनेक रस्ते तथा उड्डाण पुलांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचणे, मोठ्या वाहनांच्या अडथळयांमुळे रुग्णवाहिका, प्रवासी आणि माल वाहतूक ही तासंतास अडकून राहणे, डहाणू तालुक्यातील विवळवेडे, मॅढवण येथील उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहतूक ठप्प होण्याची शक्यता निर्माण होणे, वाहतूक नियोजनासाठी कंत्राटदारांकडून कोणतीच उपाययोजना केली गेलेली नसल्यामुळे वारंवार अपघाताचे प्रमाण वाढत असणे, गुजरात व मुंबईकडील दोन्ही मार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी लोकप्रतिनीधी व जिल्हाधिकारी यांनी वारंवार बैठका घेऊन देखील कोणतीच उपाययोजना न होणे, निकृष्ट रस्त्यामुळे दिनांक ३१ मे, २०२५

रोजी मॅढवन-खिंडवर झालेल्या अपघातामध्ये तीन निरपराध लोकांचा झालेला मृत्यू, रस्त्याचे काम निकृष्ट करणाऱ्या कंत्राटदारावर व सदर कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"शासन आदेश दिनांक १९ मे, २०२५ नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत एका गावांतर्गत एका वेळी केवळ एकाच शेत रस्त्याचे काम करता येत असणे, शेत रस्त्याची कामे शक्यतो उन्हाळ्यात करावी लागत असणे, त्यामुळे गावातील इतर क्षेत्र रस्त्यांची कामे करण्यास पुरेसा कालावधी उपलब्ध होत नसणे, शेत रस्त्याच्या कामावरील मजुरांची ऑनलाइन हजेरी घेताना शेतात नेटवर्क कमजोर (वीक) असल्याने तांत्रिक समस्या येत असणे,ग्राम रोजगार सेवकांना उद्‌भवणाऱ्या तांत्रिक/ ऑनलाइन समस्या सोडवता याव्यात यासाठी त्यांना वेळोवेळी होणाऱ्या बदलाचे प्रशिक्षण देणे गरजेचे असणे, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामरोजगार सेवकांना दरमहा ८००० रुपये मानधन देण्यास मान्यता देणे, मात्र अद्याप या बाबीची अंमलबजावणी होत नसल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. अनिल पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"जळगाव शहरातील ऑप्टिकल दुकानांमध्ये नागरिकांच्या डोळ्यांच्या वैद्यकीय उपचाराची पध्दत अत्यंत क्रूर आणि संतापजनक असणे, चष्म्याच्या व्यवसायाचे रूपांतर एका अनियंत्रित 'बाजारात' झाले असून केवळ व्यावसायिक फायद्यासाठी तांत्रिक ज्ञान नसलेले लोक नेत्ररोग तज्ज्ञ बनून वावरत असणे, या सदोष तपासणीमुळे समाजात नेत्रविकारांचे प्रमाण वाढून नागरिकांना शारीरिक व मानसिक मनस्ताप सहन करावा लागत असणे, या प्रकरणात आरोग्य विभाग आणि अन्न व औषध प्रशासकीय यंत्रणेने कमालीचा निष्काळजीपणा आणि दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येणे, विनापरवाना डोळे तपासणी करणाऱ्या दुकानांवर अंकुश ठेवण्यात ही यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरलेली असणे, शासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन तात्काळ अशा अनधिकृत केंद्रांची चौकशी करून ती बंद करावीत आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी नागरीकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**आठ : अशासकीय विधेयक :-**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतू पुढे ढकलण्यात आलेली अशासकीय विधेयकाची सूचना)**

**श्री. अमित साटम, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र भविष्य कल्याण विधेयक, २०२६

**नऊ : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतू पुढे ढकलण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४१**

"राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २९**

"पुणे शहरातील मुळा-मुठा नद्या आणि इतर जलस्त्रोत गंभीर प्रदूषित असणे, अपुरी सांडपाणी प्रक्रिया क्षमता, अनधिकृत बांधकामांमुळे नद्यांमध्ये सांडपाणी मिसळणे, पाणीपुरवठयाचे असमान वितरण (काही भागात ६०० लिटर तर काहीत १०० लिटर प्रति व्यक्ती), खडकवासला आणि इतर धरणांमधील प्रदूषण वाढणे, यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता धोक्यात येणे आणि आरोग्य समस्या निर्माण होणे, नद्यांचे पुनरुज्जीवन आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना (जसे JICA) गती देणे आवश्यक असणे, तरी शासनाने पुणे शहर आणि जिल्ह्यातील नदी प्रदूषण रोखण्यासाठी आणि पाणीपुरवठा समान व न्यायपूर्ण करण्यासाठी तातडीने कालबद्ध योजना राबवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ८९**

"राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमीपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.